सन २०१५-१६ पासून राज्यातील इयत्ता दहावीच्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांची कल चाचणी घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्र. परीक्षा-२०१५/प्र.क्र.२४९/एसडी - २
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १० नोव्हेंबर, २०१५

वाचा : शासन निर्णय क्र. व्यमानिसं - ३२१४/(५२/२०१४)/प्रशिक्षण दि. ३० ऑक्टोबर, २०१४

प्रस्तावना :-

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक स्तरावर व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशनाचे काम प्रभावीपणे होणे गरजेचे आहे. दहावीनंतर पुढील शिक्षणाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यासंदर्भात बरेच विद्यार्थी व पालक यांच्यामध्ये संभ्रम निर्माण झालेला दिसून येतो. या परिस्थितीत त्यांना योग्य मार्गदर्शनाची गरज असते.

विद्यार्थ्यांचा कल विचारात घेवून त्यांना त्यांच्या आवडीनुसार व क्षमतेनुसार वेळीच शैक्षणिक क्षेत्र निवडीस मदत केल्यास त्यांच्या उपजत कलागुणांना पुरेसा वाव मिळतो. (राज्याचा १०+२+३ हा शैक्षणिक आकृतीबंध विचारात घेता प्रत्येक टप्प्यावर विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या विविध शैक्षणिक क्षेत्रांची व व्यवसायांची माहिती देणे उपयुक्त ठरेल.)

विद्यार्थ्यांस स्वत:च्या कुटुंबाबरोबरच भारतीय समाजरचनेचा एक जबाबदार व सुसंस्कृत नागरिक घडविण्याची जबाबदारी पालक आणि शाळेची आहे. त्याकरिता विद्यार्थ्यांना अनुरुप मार्गदर्शन व सहाय्य देण्याची गरज आहे. शासनातर्फे व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई ही संस्था विद्यार्थ्यांचे मानसशास्त्रीय कसोट्यांच्या आधारे विविध शैक्षणिक क्षेत्रासंदर्भात मार्गदर्शन व समुपदेशन करते. संस्थेचे मुख्यालय मुंबई येथे असून आठ विभागात विभागीय कार्यालये आहेत. संस्थेमध्ये तांत्रिक मनुष्यबळ पर्याप्त स्वरुपात उपलब्ध नाही. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांचे कसोट्यांच्या आधारे मार्गदर्शन व समुपदेशन करण्यास मर्यादा पडतात.

राज्यात जवळपास २२ हजार माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा / महाविद्यालये आहेत. त्यामध्ये जवळपास ६५ लाख विद्यार्थी शिक्षण घेत असून त्यासाठी अंदाजे २.५ लाख शिक्षक कार्यरत आहेत. व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई या संस्थेतून व्यवसाय मार्गदर्शन पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या राज्यातील शिक्षक समुपदेशकांची एकूण संख्या ५३९ आहे. राज्यातील एकूण शाळा, शिक्षक व विद्यार्थी संख्या विचारात घेता समुपदेशन करण्यासाठी पात्र असणाऱ्या तज्ज्ञ व्यक्तींची संख्या अत्यल्प आहे. त्यामुळे समुपदेशनाचा लाभ फारच थोडया विद्यार्थ्यांना होतो.

आजमितीस मानसशास्त्रीय कसोट्या या पेपर-पेन्सिलच्या माध्यमातून घेतल्या जातात. विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता या पध्दतीचा लाभ सर्व विद्यार्थ्यांना देता येत नाही.

विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणाकडे वाढणारा कल लक्षात घेता त्यांना यासंदर्भात शास्त्रीयदृष्ट्या योग्य मार्गदर्शन मिळणे आवश्यक असल्याने मानसशास्त्रीय कसोटयांची उपयुक्तता विचारात घेवून याचा लाभ देण्याच्या दृष्टीने मानसशास्त्रीय कसोट्यांद्वारे उच्च शिक्षण किंवा व्यवसायासाठी मार्गदर्शन करण्याकरिता धोरण व कार्यपध्दती निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न राज्यातील सर्व माध्यमिक शाळांतील इयत्ता दहावीत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची मानसशास्त्रीय चाचणी (कल चाचणी) घेण्यात येईल. या माध्यमातून त्यांना उच्च शिक्षण अथवा व्यवसायासाठी योग्य क्षेत्राची निवड करण्यास सहाय्य करुन आवश्यकतेनुसार वैयक्तिक मार्गदर्शन व समुपदेशन करण्यात येईल.

**२. उद्देश :-**

२.१) इयत्ता दहावीच्या प्रत्येक विद्यार्थ्याला व्यवसाय मार्गदर्शन सेवेद्वारे शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांची निवड करण्यास मार्गदर्शन करणे.

२.२) विद्यार्थी व पालक यांना विविध शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रांची माहिती देवून जाणीव जागृती करणे.

**३. कार्यपध्दती :-**

इयत्ता दहावीच्या सर्व विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय कसोट्या घेण्यासाठी पुढील कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात येईलः-

३.१) मानसशास्त्रीय कसोट्या तयार करणे - या क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींच्या सल्ल्याने मानसशास्त्रीय कसोटी पुर्नरचित करण्यात येतील. या संदर्भातील सर्व जबाबदारी व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था यांची राहील.

३.२) ऑनलाईन संगणक प्रणाली विकसित करणे - व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई या संस्थेकडे असलेल्या मानसशास्त्रीय कसोट्या ऑनलाईन पध्दतीने घेण्याकरिता संगणक प्रणाली विकसित करण्यात येईल. याकरिता राज्य मंडळ, पुणे या संस्थेचे सहकार्य घेण्यात येईल.

३.३) सदर कल चाचण्या ऑनलाईन पध्दतीने राज्य मंडळातर्फे सन २०१५-१६ पासून घेण्यात येतील.

३.४) ज्या ठिकाणी ऑनलाईन पध्दतीने कलचाचणी घेणे शक्य होणार नाही, त्या ठिकाणी ऑफलाईन पध्दतीने कलचाचणी घेण्याकरिता OMER पध्दतीचा वापर करण्यात येईल व याकरिता आवश्यक कार्यवाही राज्य मंडळाकडून करण्यात येईल.

३.५) इयत्ता दहावी परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करण्यासाठी राज्य शासनामार्फत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) पुणे येथे हेल्प लाईन सुरु केली जाईल. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशनाची व्यवस्था संबंधित विभागीय व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था या कार्यालयांमार्फत करण्यात येईल.

४. मानसशास्त्रीय कसोट्या ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने तयार करुन त्यांची प्रत्यक्षात अंमलबजावणी करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यबळ गट गठीत करण्यात येत आहेः-

**४.१) कार्यबळ गट :**

| | |
|---|---|
| १) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे | सदस्य |
| ३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |
| ४) संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद), पुणे | सदस्य |
| ५) अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे | सदस्य |
| ६) संचालक (तांत्रिक), नॅशनल इन्फॉरमेशन सेंटर (एन.आय.सी), पुणे | सदस्य |
| ७) या क्षेत्रात काम करणाऱ्या अनुभव असणाऱ्या नामवंत चार अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी (राज्य शासनाने नामनिर्देशित करावयाचे) | सदस्य |
| ८) उपसंचालक, व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई | सदस्य सचिव |

**४.२) कार्यबळ गटाची कार्यकक्षा :**

१) मानसशास्त्रीय कसोट्या पुर्नरचित करणे.

२) मानसशास्त्रीय कसोट्यांचे (ऑनलाईन / ऑफलाईन) सॉफटवेअर विकसित करणे.

३) मानसशास्त्रीय कसोट्यांच्या आयोजनाची कार्यपध्दती निश्तिच करणे.

४) मानसशास्त्रीय कसोट्यांचे आयोजन करणे.

५) मानसशास्त्रीय कसोटीचा पथदर्शी अभ्यास करणे.

६) मानसशास्त्रीय कसोट्यांचे सॉफ्टवेअर विकसित करण्याची तसेच कल चाचणी घेवून त्यांच्या निकाल देण्याची संपूर्ण जबाबदारी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांची राहील.

७) मानसशास्त्रीय कसोट्यांच्या आयोजनासाठी आवश्यक तांत्रिक सहाय्य, कुशल मनुष्यबळ उपलब्ध करुन देणेबाबत उपाययोजना करणे.

८) मानसशास्त्रीय कसोट्यांच्या अंमलबजाणीचा आढावा घेवून त्यामध्ये आवश्यक सुधारणा करणे व शासनास अहवाल अवगत करणे.

५. मानसशास्त्रीय कसोट्यांचे ऑनलाईन / ऑफलाईन पध्दतीने आयोजन, अंमलबजावणी, प्रशिक्षण व अनुषंगिक बाबींसाठी येणारा संपूर्ण खर्च महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्याकडे उपलब्ध असणाऱ्या निधीमधून भागविण्यात यावा.

६. हेल्पलाईन उभारणी, समुपदेशकांचे प्रशिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण इत्यादीसाठी आवश्यक निधी सी.एस.आर. च्या माध्यमातून उपलब्ध करुन घेण्यासाठी तसेच इतर विभागांशी समन्वय साधण्यासाठी विद्यापरिषद, पुणे यांच्यामार्फत प्रयत्न करण्यात येईल.

७. या कलचाचणीतून दिसून आलेल्या विद्यार्थ्यांच्या कलानुसार त्याला उच्च शिक्षणासाठी किंवा व्यवसायासाठी प्रवेश वा मदत यासाठी शासनाची हमी असणार नाही. तथापि विद्यार्थ्यांचा कल विद्यार्थ्यांस व पालकांना अवगत व्हावा या मर्यादित हेतूने सदर चाचणीचे प्रयोजन आहे. विद्यार्थ्यांच्या कल चाचणीचा निकाल व प्रवेश प्रक्रिया यांचा कोणताही संबंध असणार नाही.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१५१११०१४३३५२२८२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Baban
Ranganath Mali

Digitally signed by Baban Ranganath Mali
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=058a3365edca1bab7b5a512fa9b602a739d12b55819b89fd7154a7a28ccbaa1e, serialNumber=d2974b67a90018e618d5e11ffd00382f063542cc3d866753cfd5a4ad652b1908, cn=Baban Ranganath Mali
Date: 2015.11.10 14:53:03 +05'30'

**( बी. आर. माळी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. मा.प्रधान सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा) यांचे स्वीय सहाय्यक.
६. आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
१०.अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
११.संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (SCERT), पुणे.
१२.राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
१३.संचालक (तांत्रिक), राष्ट्रीय सूचना प्रसारण केंद्र (N.I.C.), पुणे.
१४.सर्व विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे.
१५.सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक.
१६.सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक ), जिल्हा परिषद.
१७.सर्व शिक्षण निरीक्षक (दक्षिण / पश्चिम / उत्तर), बृहन्मुंबई.
१८. सर्व प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था.
१९.सर्व उप सचिव / अवर सचिव / कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०.निवड नस्ती. (एसडी-२)

## परिशिष्ट - अ

## मानसशास्त्रीय कसोटी आयोजन कार्यवाही - कृतीआराखडा

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाशी संलग्न राज्यातील सर्व माध्यमिक शाळांतील इयत्ता दहावीत शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांची मानसशास्त्रीय चाचणी (कल चाचणी) घेवून कल अहवाल देण्यात येईल. त्याच्या आयोजन व कार्यवाहीचे टप्पे पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | कामाचा तपशील | कालावधी | कार्यान्वयीन यंत्रणा |
|---|---|---|---|
| १ | मानसशास्त्रीय कसोट्या पुर्नरचित करणे आणि नवीन कसोट्या विकसन कार्यवाही सुरु करणे. | नोव्हेंबर, २०१५ | व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई. |
| २ | ऑनलाईन / ऑफलाईन संगणक प्रणाली विकसित करणे व अद्ययावत करणे. | डिसेंबर, २०१५ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे आणि व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई. |
| ३ | पथदर्शी अभ्यास करणे (शासकीय, अनुदानित, विना अनुदानित शाळांची नमुना म्हणून निवड करणे), पथदर्शी अभ्यासातून आलेल्या निष्कर्षाच्या आधारे सुधारणा करणे. | डिसेंबर, २०१५ | व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई. |
| ४ | मानसशास्त्रीय कसोट्यांच्या आधारे मार्गदर्शन व समुपदेशनासाठी उजळणी प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण साहित्य विकसन करुन जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेतील अधिव्याख्याते, शिक्षक समुपदेशक व विषय साधन व्यक्तीचे प्रशिक्षण आयोजित करणे. | जानेवारी, २०१६ | व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई. |
| ५ | प्रत्येक माध्यमिक शाळेतील व्यवसाय विज्ञ प्रशिक्षण घेतलेले शिक्षक, संगणक साक्षर परीक्षक व समन्वयक यांचे प्रशिक्षण आयोजित करणे. | जानेवारी, २०१६ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. |
| ६ | विद्यार्थ्यांना महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून बैठक क्रमांक प्राप्त झाल्यानंतर इयत्ता दहावी तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षेच्या कालावधीत मानसशास्त्रीय कसोटी घेण्याचे नियोजन करण्यात येईल. | फेब्रुवारी, २०१६ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | इयत्ता दहावीच्या परीक्षेनंतर मानसशास्त्रीय कसोट्यांवर आधारित सल्ला विद्यार्थ्यांना एप्रिल / मे महिन्यात संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. | एप्रिल / मे, २०१६ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद), पुणे. |
| ८ | विद्यार्थ्यांचा कल स्वतंत्र प्रमाणपत्राद्वारे त्याला इयत्ता दहावीच्या निकालाबरोबर उपलब्ध करण्यात येईल. | जून, २०१६ | महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे आणि महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद), पुणे. |
| ९ | इयत्ता दहावीच्या परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करण्यासाठी राज्य शासनामार्फत हेल्पलाईन सुरु केली जाईल. तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुपदेशनाची व्यवस्था विभागीय व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था या कार्यालयामार्फत करण्यात येईल. | एप्रिल, २०१६ ते जून, २०१६ | व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई आणि जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था. |
| १० | अभिरुची, अभियोग्यता, बुध्दिमत्ता व व्यक्तिमत्व या घटकांचा विचार करुन तयार केलेल्या नवीन मानसशास्त्रीय कसोट्यांचा वापर करुन ऑनलाईन पध्दतीने पथदर्शी प्रकल्प राबविणे व त्याच्या आधारे आवश्यक सुधारणा करणे. | जुलै, २०१६ ते सप्टेंबर, २०१६ | व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. |
| ११ | इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन मानसशास्त्रीय कसोट्यांच्या आधारे शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन व समुपदेशन करणे. | ऑक्टोबर, २०१६ ते फेब्रुवारी, २०१६ | व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई आणि महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे. |
| १२ | झालेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यानुसार पुढील वर्षामध्ये अंमलबजावणीसाठी आवश्यक त्या सुधारणा करणे. | डिसेंबर, २०१६ | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद), पुणे आणि व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई. |
| १३ | वरील सर्व प्रकल्पाचा अभ्यास करुन संशोधन अहवाल तयार करणे. मानसशास्त्रीय कसोट्यांवर आधारित संशोधन निरंतर पुढे सुरु ठेवणे. | मार्च, २०१७ पासून पुढे | महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद), पुणे आणि व्यवसाय मार्गदर्शन व निवड संस्था, मुंबई. |